म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १७०३
१९२०

ग्रंथ प्रसारक
१ लें
१५०२

निळोबास्वामीकृत

# तुकाराम स्तुति

श्रीगुरुमहाराज कृष्णबुवा गारवडेकर यांनीं शुद्ध केलेली.

---

मुद्रक-प्रकाशक,
सिताराम गणेश गोडबोले.
यांनीं पुणें येथें शुक्रवार पेठेंत
"... ..." प्रेस मध्यें
... केला.
...२०

किंमत ६ आणे.

१७०३
REFBK-0001813
REFBK-0001813

९५०३

REFBK-0001813
REFBK-0001813

# अर्पण पा

तुमचे स्तुतियोग्य कोठें माझी वाणी ।
मस्तक चरणीं ठेवितसें ॥ १ ॥
भक्तिभाग्य तरी नेदीं तुळसीदळ ।
जोडूनी अंजुळ उभा असें ॥ २ ॥
कैचें भाग्य ऐसें पाविजे संनिध ।
नेणें पाळूं विध करुणा भाकीं ॥ ३ ॥
संतांचे शेवटीं उच्छिष्टांची आस ।
करूनीयां वास पाहातसें ॥ ४ ॥
करीं इच्छा मज म्हणोत आपुलें ।
एखादिया बोलें निमित्त्याच्या ॥ ५ ॥
तुका म्हणे शरण आलों हें साधन ।
करितों चिंतन रात्रंदिवस ॥ ६ ॥

श्रीगुरुमहाराज कृष्णबुवा गारवडेकर
यांच्या चरणीं
त्यांच्याच कृपेनें पूर्ण झालेला
हा ग्रंथ
अर्पण असो.

९६९३

# प्रकाशकाचे दोन शब्द.

आपल्या विद्वान, ज्ञानी, सत्यरूपी, तत्त्वज्ञानी साधु-संतांच्या विचारोंवांच्या अशा निरनिराळ्या दिशा आहेत. ह्या विचारांची महती, अजरामरता, त्यांचें गांभीर्य, धैर्य, त्यांच्या ओगाची पूर्तता, त्यांत दिसणारें युक्तिवादाचें रहस्य, विषयांचें महत्त्व व सत्य काय आहे हें पाहण्याचे बुद्धीचे श्रम, जाणणें-एक गुरुमहाराजच सांगू शकतील व गुरु शिवाय जगांत रस्ताच दिसणार नाहीं. म्हणून पूर्वपरंपरा चालत आलेली पुढें चालू ठेविली पाहिजे, अशी भावना धरून श्रीगुरुमहाराज कृष्णबुवा गारवडेकर यांनीं निळोबाकृत तुकारामस्तुति ३३३ श्लोकांत आहे. ती रोजपाठाकरितां सकलभक्त लोकांची सोय व्हावी अशी इच्छा दाखविल्यावरून आम्हीं त्यांच्याकडून त्यांना श्रीक्षेत्र पिंपळनेर मुक्कामी प्रसाद म्हणून मिळालेली मूळ हस्तलिखित प्रत मागून घेतली व तिचें काम सुरू करून त्यांच्याकडून शुद्ध करवून हा ग्रंथ छापला आहे.

हा ग्रंथ भक्तिरसानें भरलेला समुद्रमंथनाचे वेळीं निघालेला अमृताचा कलश आहे असें ह्मणणें भाग पडतें. कारण, भक्तिमार्गी आपलें आराध्यदैवत किंवा परमेश्वर हा सर्वज्ञ-सर्वसाक्षी कर्ता-करविता दयाघन असा आहे, असा भाव धरून आराधनेच्या नानाविध

मार्गानें त्या परमेश्वरापाशीं सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्यता या चार मुक्तींपैकीं कोणती तरी मुक्ति प्राप्त करून घेतली तर त्यांतच परम सुख आहे असें मानतात. व त्यांस योग्य अशा ग्रंथाचाच आधार पाहिजे म्हणून हें पुस्तक श्रीगुरुमहाराज कृष्णबुवा गारवडेकर यांच्या सांगण्यावरून आह्मी काढलें आहे, यास ग्राहक चांगले मिळतील यांत शंका नाहीं, व पुनः दुसरी आवृत्तीहि आम्हांस लवकरच काढण्याचा प्रसंग परमेश्वर आणील अशी खात्री आहे. तसेंच यापुढें आह्मीं या ३३३ श्लोकांवर वाक्यवृत्तीसारखा ग्रंथ श्रीगुरुमहाराज कृष्णबुवा गारवडेकर हे करून देणार आहेत त्यासहि ग्राहकांनीं नांवें नोंदवावीं व अज्ञानात पुरून जाऊन नाहींसा होण्याच्या मार्गास लागलेला समग्र ज्ञानसंग्रह बाहेर पडून सुउपयोग व्हावा ही परमेश्वराची प्रार्थना करितों.

सिताराम गणेश गोडबोले.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्रमांक ९८९३
का०५ १५०३

॥ श्री ॥

# ॥ अथ तुकाराम स्तुति ॥

# निळोबास्वामीकृत

## ॥ श्लोक प्रारंभः ॥

नमो सद्गुरू तूकया ज्ञानदीपा । नमो सद्गुरू सच्चिदानंदरूपा ॥ नमो सद्गुरू भक्तकल्याणमूर्ती । नमो सद्गुरू भास्करापूर्णकीर्ति ॥ १ ॥

तुझा आठवे वीसरे आपणातें । तरंगाजळीं घालितां जेविं होतं ॥ आळंकार सोनेंचि होऊनिठेला । नीळायापरी आठवी सद्गुरूला ॥ २ ॥

तुका सद्गुरूहा तुका सद्गुरूहा । तुका नातुडे सच्चिदानंद तो हा ॥ जया मोहरा सर्व सिद्धांत जाले। न तुके माहमौन्य घेऊनि ठेले ॥ ३ ॥

जनी वंजनी बोलतां हा तुकावा । करितां पुजा आणिती नित्यभावा ॥ स्फुरद्रूप तो सर्व जाणोनि नेणे । पहा सांडिलें सर्वसाक्षित्व जेणें ॥ ४ ॥

असद्भाग होणेंचि मीहो जयातें । सदत्वासि कैसेनि

येणें तयातें ॥ जडत्वासि जो नातळे चित्प्रकाशे। चिदाभास तो बोलिजे त्यासि कैसें ॥ ५ ॥

नव्हे दुःख आनंद त्यातें ह्मणावें। आनंदासि आनंदता केवि पावे ॥ नये देखतां बुडळें आबळासी। निळायापरी आठवी सद्गुरूसी ॥ ६ ॥

जयाची वदे पूर्ण वेदार्थवाणी। ह्मणावें कसें वो तयालागि वाणी। परब्रह्मरूपी असा हा तुकावा। तयाचे तुकी कोण ऐसा तुकावा ॥ ७ ॥

मनुष्याकृती रावयें ख्याति केली। शिळाशीखरें सागरीं तारियेली ॥ तुका स्वामि हा पूर्णब्रह्म प्रकाशी। जळीं रक्षिलें निर्जिवा कागदासी ॥ ८ ॥

महाराज हा जन्मला मृत्युलोकीं। दुजी ऊपमा नाढळे ईहलोकीं ॥ भवसिंधुसी बांधिला सेतु जेणें। अनाथादिनाकारणें तूकयानें ॥ ९ ॥

तुका हा तुका हा परब्रह्मरूपी। तुकीतां तुका हा तुकळासस्वरूपीं ॥ तुका स्वामितें नामवाचेसिगातां। बहूसानिळा हा पावला वर्म हाता ॥ १० ॥

असे जो सदा नित्य एकांतवासी। असे जो सदा सर्वदाही उदासी ॥ असे जो सदा भोग त्यागें विरोधी। असे जो सदा रंगला अंतरंगीं ॥ ११ ॥

तयाचे पदीं रंगलें चित्त माझें। सुखा पावलें सच्चिदानंद भोजें ॥ म्हणोनी निळा चिंतनी तोचि चिंती। सखा सोयरा सद्गुरू तोचि अंतीं ॥ १२ ॥

असे जो सदा देखण्याही निराळा। न लक्षोचि

लक्षा जिवाचा जिव्हाळा ॥ नये जो कदा देखतां एक-
तांही । असे जो सदां दिव्यदेहीं विदेही ॥ १३ ॥

नये जो कदां स्पर्शतां कवळितांही । नये जो कदां
देखतां एकतांही ॥ नव्हे जो कदां येकदेसी विदेसी ।
अलक्षी निळा लक्षितो नित्य त्यासी ॥ १४ ॥

आशिर्वाद देतां कदाही न भागे ॥ करी सत्य वाक्या
न चुके प्रसंगें ॥ अशा अर्चितां सद्गुरू तूकयाला ।
निळा चिंतिलें तेंचि पावोनि ठेला ॥ १५ ॥

असे सर्व व्यापी सदांसर्वदांही । नसे नाम ना रूपही
ज्यासि कांहीं । असे जो सदा व्याप्य व्याप्या निराळा ।
नयांचे पदीं रूळतो नित्य नीळा ॥ १६ ॥

न देखे रवी अंधकारासि जैसा । कदा बंधना न
देखे मुक्त तैसा ॥ आशा सद्गुरू तूकयासी भजावें ।
भजोनी सदा तोचि होऊनि जावें ॥ १७ ॥

तुका भासला मानवी वेशधारी । परी हा लिळा वि-
ग्रही निर्विकारी ॥ स्वयें श्रीहरी व्यापकू सर्व जीवा ।
एक तोचि तो हा परब्रह्म ठेवा ॥ १८ ॥

असोनी नसे सर्वदा देह गेहीं । नसोनी असे सस्वरू-
पींच पाहीं ॥ नलक्ष्येचि कान्हा लिला विग्रहीसा । दि-
सोनी जळीं वेगळा भानु जैसा ॥ १९ ॥

निळा पावला थोरपुण्यें तयासी । मनीं चिंततां स-
द्गुरू तूकयासी ॥ महालाभ आलभ्य तो प्राप्त जाला ।
पदीं लागतो तोचि होऊनि ठेला ॥ २० ॥

नमो सद्गुरू स्वामिया तूकयासी । असें बोलतां

बोलण्यासीच ऐसी ॥ असे शब्दव्यापी स्वयें शब्दवीता। परी नाकळे शब्द त्याही अतीता ॥ २१ ॥

असे व्यापुनी सर्वदा व्योम सर्वा । परी नाढळे स्पर्शनीं स्पर्शभावा ॥ तसा हा तुका तूकितां तूकवेना । लिला विग्रहीं तो कदाही कळेना ॥ २२ ॥

असोना जिवीं जीवमात्रा निराळा । घटीं बिंबला जेवि तो अंतराळा ॥ असे व्यापुनी वेगळें व्योम जैसें । असे सद्गुरू स्वामिचें रूप तैसें ॥ २३ ॥

दिसे दर्पणीं दर्पणातें न सीवे । असे वेगळेंचा अलिप्त स्वभावें ॥ जसें स्वप्नही भासुनी सत्यनोहे । तसें दृश्य मिथ्याच तो सत्य आहे ॥ २४ ॥

निजानंद आनंदवीतो मनाला । मनीं तोचि तो भासतो लोचनाला ॥ तयावीण हें रिक्त नाहींच कोठें । दिसे सर्व जें त्यांतरीं तोचि भेट ॥ २५ ॥

असे दृश्य अदृश्य त्याही परौता । जिवी जीवनाहूनियां जीववीता ॥ नव्हे त्याविणें सर्व कांहींच ऐसा । मृगांबुरवी भासवी मिथ्य जैसा ॥ २६ ॥

लिला कौतुकी सर्व होऊनि ठेला । नसे वेंचला ना गुणत्वासि आला ॥ जयालागिं होणें न होणें असेना । जरी दाविती आपणा लागि नाना ॥ २७ ॥

असें दखतां दीसतो तोचि अंगें । लिला नाटकी सर्व घेऊनि सेंगें ॥ नहोना कदा सर्वही तोचि जाला । परी आपआपी स्वरूपींच ठेला ॥ २८ ॥

दिसे दृश्य अदृश्य त्याही निराळा । क्षरा अक्षरा-

तीत जोका स्वलीदा ॥ असंभाव्य होऊनि कांहींच नोहे। नहोनी सदा सर्वदा तोचि आहे ॥ २९ ॥

अनेका घटीं दाउनी आत्मबिंबा । परी जेथिचा तेथ भानु स्वयंभा ॥ नसे स्पर्शला फाकला तो कदाहीं । तसा सद्गुरू भासला सर्व देहीं ॥ ३० ॥

घट भंगिल्या भंगल बिंब नाहीं । असे जेथिचें तेथ निश्चित पाहीं ॥ तसा सद्गुरू सर्व व्यापूनि ठेला । परी नातळे व्यापिलें त्या निराळा ॥ ३१ ॥

असे भानुव्योमी प्रभा फाकलीसे । परी भिन्न नोहूनि बिंबीं विलासे ॥ तसा सद्गुरू जातना येत नाहीं । असे जेथिचा तेथ सर्वत्र पाहीं ॥ ३२ ॥

नयेना कदा जाइना दूर कोठें । नसेना असे आपआपींच दाटे ॥ आशा सद्गुरू ॐ नमो आत्मयाला । निळा वंदिता वंदनी तोचि जाला ॥ ३३ ॥

आरूपची हा व्यापला सर्व देहीं । परी देहवीदेहता त्यांसि नाहीं ॥ जगद्वंद्य हा वंदनाही निराळा । नसोनी असे सर्व दाऊनि लीला ॥ ३४ ॥

नसे नेणतां नेणिवेमाजि कोठें । बहू जाणतां जाणिवाही न भेटे ॥ आशा सद्गुरूच्या पदा लागतांहो । पदा देखनी तोचि होऊनि राहो ॥ ३५ ॥

नसे रूप ज्या सर्वही तोचि जाला । नयोनी रुपा आपआपींच ठेला ॥ नसेना असे व्याप्य ना एक देशी। तया वंदिलें सद्गुरू तूकयासी ॥ ३६ ॥

अकस्मात येऊनियां भेटि दीली । परी भेटण्यामाजि

जाणीव नेलें ॥ अशा जाणण्या नेणण्याही निराळा । करूनी पदीं स्थापिला नित्य नीळा ॥ ३७ ॥

कशी हे कृपा सद्गुरू तूकयाची । नुठेची कदा देहऊर्मी देहाची ॥ मनीं मनहि हारपोनीच गेलें । पदा चिंतितां चित्त हीरोनि नेलें ॥ ३८ ॥

नुठे बुद्धिचा अल्प उल्लेख तोही । अंतःकर्णिचा शून्य संकल्पप्राहा ॥ निळा या परी मुग्ध होऊनि ठेला। नेणो तुकया काय बाधूनि ठेला ॥ ३९ ॥

स्वयें सत्य आसत्य तें काय जाणें । जसा सूर्य अंधार लेशा न जाणें ॥ तसा सद्गरू न देखे दृश्य जातां । निजानंद रूपीं वसे तो सतंता ॥ ४० ॥

न तुकेचि जो तो म्हणे हा तुकावा । तुका नातुडे तो नये रूप नावा ॥ कसें तूक घालू अरूपासि आतां । नये लक्षितां बुद्धि जातां समस्तां ॥ ४१ ॥

न घालितां व्योम हे तागडीही । जया तूकितां तूक दूजेंचि नाहीं ॥ नये भास्करा तूक काटाळ कोठें । तसा हा तुका साम्य दूजें न भेटे ॥ ४२ ॥

तुळे घालितां पृथ्वी ये तूक नाहीं । दुजे मेरु मांदार सिंधूपि तेही ॥ तसा हा तुका तूकितां तुकवेना । नयेची तुका साम्य दूजें दिसेना ॥ ४३ ॥

असा सद्गुरू भेटतां लाभ कोटी । तया भेटल्यासी स्वरूपींच गाठी ॥ कदा सद्गुरू द्वैतभावो दिसेना । असे अंतरीं बाहेरी तो कळेना ॥ ४४ ॥

जेणें अर्चिलें सद्गुरूच्या पदासी । वरी सौख्य सा-

काव्य ५५०

म्राज्य येऊनि त्यासी । निळा अर्चुनी सद्गुरू तूकयाला । निजानंद बोधीं स्वयें तो विराला ॥ ४५ ॥

जया पूजिलें आदरें पांडुरंगें । विमानस्थ केलें प्रयाण प्रसंगें ॥ तनू मानवो दिव्यरूपींच केली । न त्यागीतिये दिव्यलोकासि नेली ॥ ४६ ॥

मनोभाव माझा तया पादपद्मीं । परी गूजसा राहिला तोयपद्मीं ॥ निळा त्यापरी लीन तेथेंचि जाला । पदीं तूकयाच्या विरोनीच गला ॥ ४७ ॥

स्वयें दृश्य द्रष्टा निजांगेंचि जाला । हरिभक्त हा भेद गीळोनि ठेला ॥ नसे दीसतें देखणें सत्य जेव्हां । निजानंदरूपींच वास्तव्य तेव्हां ॥ ४८ ॥

नसे एक ना दूसरें जासि कांहीं । निजानुभवी भेदु हा सत्य नाहीं ॥ स्वयेंचि स्वयें न देखे आपणासी । तया दूसरें तें न भासेचि शेषी ॥ ४९ ॥

हरी सद्गुरूसीं कदा भेद नाहीं । कवी बोलिले व्यास वाल्मीक तेही ॥ असा नित्य बोधू शुका नारदाला । विदेही नृप येचि बोधीं निवाला ॥ ५० ॥

हरी सद्गुरू संतही ऐक्य भावें । जेणें लक्षिलें अर्थिला तोचि देवें ॥ आलें स्वानुभवा तेंहि तैसेंचि जालें। निजानंदरूपीं हरीसी मिळाले ॥ ५१ ॥

जगद्रूप हा सद्गुरू चित्प्रकाशे । दुजे नातळोनी अभासे निजांशे ॥ महद्ब्रह्म व्योमादिकें तोचि जाला । अणूरेणुही मस्तकीं तोचि ठेला ॥ ५२ ॥

जया रोमरंध्रीं बहू ब्रह्मगोळ । अणूमाजि तो सांगरूपें

कृपाळ । समस्तासि व्यापूनियां व्याप्य जाला ॥ परी तो असे आपरूपीं लपाला ॥ ५३ ॥

नसे एक ना दूसरें ज्यासि कांहीं । नव्हेनी असे सर्वही सर्वदाही ॥ जया रूप ना नामही सोसवेना । तथा नाटकें दाविले लोकनाना ॥ ५४ ॥

असा हा तुका कौतुकी आपरूपी । नसेना असे नातुडे वागजल्पीं ॥ जया लक्षिता लक्ष मध्येंचि वीरे । बहू तर्क सिद्धांत होती फरारे ॥ ५५ ॥

प्रकाशें जयाच्या दिसे सर्व कांहीं । दिसे देखतां तोचि होऊनि नांहीं ॥ असा नाटकी लाघवी सूत्रधारा । लिला विग्रहीं पूर्ण कामावतारा ॥ ५६ ॥

जेणें निर्मिलें त्रिदशा ब्रह्मयासी । पदीं स्थापिलें कार्य सांगोनि त्यासी ॥ महर्षी ऋषी ज्याचिया नीजसत्ता । करीती सदा यज्ञयागादि संस्था ॥ ५७ ॥

जेणें निर्मिलें सर्व संकल्प मात्रें । विकल्पेंचि नेदी उरों त्या स्वतंत्रें ॥ जयाची मता नेणती देवतीन्ही । नलक्ष्ये कदा त्यातरींही वसोनी ॥ ५८ ॥

दिसे दर्पणीं तें असे वेगळेंची । दिसे देखतें होउनी त्यासि तेंची ॥ तसा हा तुका सर्वलक्षा निराळा । असे दाउनी देखतां तोचि लीळा ॥ ५९ ॥

नव्हेची कदा वेगळा आपरूपा । रुपातीत हा न देखे आपआपा ॥ तयासी कसें नामरूपासि आणू । गुणातीत त्याचे कसे गूण वाणू ॥ ६० ॥

अनूलक्षितां लक्ष्य जेथें पुरेना । नवे जाणिवा जाण-

तां जाणवेना ॥ अनुमान दृष्टांत नाही जयासीं । प्रमाणासि कैसेनि आणू तयासी ॥ ६१ ॥

येथें सर्वदा मौन्य परादिकाचें । कळे रूप तर्कांतरा केवि त्याचें ॥ नये जाणिवा बुद्धिच्या जाणण्यासी । जया चिंतितां चित्त नूरेचि शेषीं ॥ ६२ ॥

स्वलीळाचिहा रूप आरूपधारी । करी कौतुकें नित्य जो निर्विकारी ॥ धरी वेश तोहीच नानापरीचे । परी वेगळा नातळे रूप त्याचें ॥ ६३ ॥

भवरोगिया नित्य आरोग्य कर्ता । असा हा प्रभू सर्व सामर्थ्य धर्ता ॥ जया ज्ञान वैराग्य सेऊनि राहे । महा यश औदार्य ऐश्वर्य पाहे ॥ ६४ ॥

क्षमा लक्ष्मी नित्य अंकीत ज्याची । पदा सेउनी अर्चनी नित्य अर्चा ॥ जयाच्या रुपा देखतांची अनंगें । तनू जाळनी पुत्र जाला निजांगें ॥ ६५ ॥

जेणें निर्मुनी कोटि ब्रह्मांड माळा । अलिप्तचि राहोनियां त्या निराळा ॥ कसी रोमरंध्रींच पाळी ढिसाळें । नव्हे पार ऐसीं विशाळे भुगोळें ॥ ६६ ॥

असे रूप मंडीत पूर्णांश जैसा । चतुर्भूज हा पाहिजे त्यासि तैसा ॥ करीं वागवी मोहरी शृंग पावा । घनःश्याम हा लक्षि तूं भक्तिभावा ॥ ६७ ॥

धरी मस्तकीं मुकुटीं मोरपीसा । असे कस्तुरी रेखिला भाळ तैसा ॥ वरी कुंडलें शोभलीं दिव्य कर्णीं । विराजे गळां कौस्तुभु सर्व लेणीं ॥ ६८ ॥

असोनी असा दिव्यरूपीं सदा हा । अरूपी लपेना

ढळे भास तेव्हां ॥ असे भाविका सर्वदा सर्व देशी । नसे नास्तिका नास्तिवादेंचि त्यासी ॥ ६९ ॥

असे च्छ हा कच्छ वराहरूपी । नृसिंह खुजा फर्शधारी प्रतापी ॥ धरी वीजयी चापपाणी विराजे । अनूजोप वेष्टित वायो तनूजे ॥ ७० ॥

जेणें सांडुनी भद्र सिंहासनासी । वनीं शोधिलें राक्षसांच्या मुळासी ॥ जेणें देवही बंदिचे मुक्त केले । महा पातकी मुक्तिस्थानासि नेले ॥ ७१ ॥

तसाची व्रजीं गोपवत्सांसि पाळी । करी गोपिका मेळवूनी धुमाळी ॥ स्वभक्तांसि पाळूनि दुष्टां निपाता । असे बौध्यरूपी न बोलोनि अंतीं ॥ ७२ ॥

पुढें यवनालागिं हा धूमकेतू । कलंकी धरी नाम विख्यातवंतु ॥ कृतायुग धर्म प्रकाशील जेव्हां । कलीदोष वारूनियां सत्य तेव्हां ॥ ७३ ॥

जया चिंतितां चित्त चैतन्य होतें । जया अर्चितां सर्व सामर्थ्य येतें ॥ जया पाहतां पाहणें तोचि होये जया ध्यासितां ध्येय ध्यातां न राहे ॥ ७४ ॥

तमूचि जसा दीपका सन्निधानें । प्रकाशेचि होऊनि राहे समानें ॥ नसे फेडणें नेसणें त्यासि कांहीं । स्वतः सिद्ध नेणें उपाधीस तेही ॥ ७५ ॥

स्वदेहींच उर्णा जसा तंतु काढी । तयासीच खेळोनियां शीघ्र मोडी ॥ तसा स्वामि हा विश्वविस्तार होतो । पुन्हा आपणामाजि त्या सांठवीतो ॥ ७६ ॥

जसा सूर्य हा व्योमिचा व्योमिं राहे । प्रकाशे परी

विश्व तो दाविताहे ॥ नियंता तसा सर्वदा आपरूपी । न भासोनि भासे तोचि तो सर्वव्यापी ॥ ७७ ॥

सुवर्णाच जाले अलंकार पाहे । परी आंतु बाहेरि सोनेंचि राहे ॥ जसा पट तंतूचि होऊनि ठेला । तसा श्रीहरी विश्व नहोनि ठेला ॥ ७८ ॥

जयालागि दूजेपणाचा अभावो । कदापी नसे नामरूपासि ठावो ॥ तेणें आपणामाजि हें दाखवीलें । बहू होउनी आपणा रंजवीलें ॥ ७९ ॥

नव्हे एक अनेक कांहींच ऐसा । माये उपाधीक दावी तमासा ॥ स्वयें देखुनी देखतां त्यासि रीझे । निजानंद रूपींच ऐसा विराजे ॥ ८० ॥

विचित्राकृती मंडपामाजि चित्रें । बहू भासती दीपज्योती विचित्रें ॥ परी ते दिसे दीपज्योतीच पाहीं । तसा एक आत्माचि हें विश्व नाहीं ॥ ८१ ॥

स्वतःसिद्धची स्वामि माझा तुकावा । तुकातीत हा नातुळे रूपनावा ॥ निळा नित्य सर्वांतरीं त्यासि पाहे ॥ तया चिंतनीं तोचि होऊनि राहे ॥ ८२ ॥

तमारी कधीं अंधकारासि नेणें । स्वयें स्वप्रकाशासि कैसेनि जाणें ॥ तसा सद्गुरु देखे ना बंधनासि । स्वयें मुक्त हें केवि मानेल त्यासी ॥ ८३ ॥

असे मुक्त तो मुक्त सर्वांसि देखे । जसें अमृतें नेणिजे मृत्युदुःखें ॥ तसा ज्ञानिया दृश्य जें त्यासि नेणें । स्वयें ज्ञानि मी हेंहि कैसेनि जाणे ॥ ८४ ॥

दिसे भास आधींच तो सत्य नाहीं । तया होत

जातें न भासे कदाही ॥ असा हा तुका नित्य आनंद-रूपी । असे नित्य तो नित्य आपस्वरूपी ॥ ८५ ॥

जया भेद हा नाढळे चित्प्रकाशें । अभेदी तया कोण आस्था विशेषें ॥ नये एक आनेक देही मनासी । निजात्माचि मी हें नुरे भान त्यासी ॥ ८६ ॥

असे सर्वदा नित्य आनंदवासी । तया विषयीं कोण गोडी विशेषी ॥ चकोरें जसा चंद्र अमृत चाखे । तसा तो कदा पंक तोया न तोखे ॥ ८७ ॥

जेणें भोगिलें सर्व ऐश्वर्य अंगें । तया दुर्भरत्वीं कसें चित्तरंगे ॥ जेणें संपत्ती त्यागिली निश्चयाची । तया कोण गोडी भिके जावयाची ॥ ८८ ॥

जयाचे घरीं लक्षभांडार कोटी । करावी मजूरी कशी त्यासि ऊठि ॥ तसा रातला तो निजात्मसुखासी । कसा तो रिझे क्षुल्लका भोगण्यासी ॥ ८९ ॥

जयाचे घरीं नित्य कैवल्य नांदे । तया दुःखदारिद्र्य केचीं प्रमादें ॥ जया जोडली संगती भास्कराची । तया-घालणी केवी घाली तमाची ॥ ९० ॥

जेणें सर्व संगासि सोडूनि दिलें । असंगासि चित्तासनीं बैसवीलें ॥ तया भेद भ्रांतीस ठावोचि नाहीं । जनीं वीजनीं वर्ततां सर्वदाही ॥ ९१ ॥

जेणें सद्गुरू अर्चिला ज्ञानदाता । तया भ्रांतिचा नाढळे लेश आतां ॥ जेणें अक्षयी भक्षिलें अमृतासी । कदा मृत्युवार्ता न बाधी तयासी ॥ ९२ ॥

जया वैद्यराजासि देखोनि जातीं । महारोग ते औषधें

कैंवि राहती ॥ जसा मारुती देखतांचि पिशाच्या । घडे भंगणी अंतरीं धाक त्याचा ॥ ९३ ॥

नव्हे सद्गुरु सन्मुख भेदु तैसा । तमारीपुढें लेश अंधारु जैसा ॥ जनीं वीजनीं एक आत्माचि होय । तरंगा जसें व्यापुनी सिंधु तोय ॥ ९४ ॥

जशा सारुपा दीसती तोयगारा । परी त्या कदा होतिना भिन्न नीरा ॥ तसे सद्गुरु स्वामि हे संतमूर्ती । अनूकार ते सस्वरूपानुवृत्ती ॥ ९५ ॥

जसा कर्पुरु कर्दळगर्भ होये । परी व्योमिचा व्योम होऊनि ठाये ॥ तसं हे जनीं भासती जीवभेद । परी ते सदा सस्वरूपीं अभेद ॥ ९६ ॥

पर्जन्यीं असंख्य वर्षती बिंदुधारा । परी एक वांचूनि कैंचा पसारा ॥ जसें तोय तें तोयची आदि अंतीं । तसें चित्स्वरूपीं जीव होती जाती ॥ ९७ ॥

जयालागिं तूं धुंडिसी जीव येथें । तरी धुंडिसी कासयालागिं तीर्थें ॥ घरीं चूकले ठेवणें त्यां विदेशी । कसें लाभसी चाळितां भूमिकेसी ॥ ९८ ॥

ह्मणे दीपज्योती प्रकाशासि दावा । पुसे गूळगोडी न जाणे स्वभावा ॥ जसें चोजवी व्योमस्थान रहाव्या । तसा लक्षिसी दूरि आत्मा पहाव्या ॥ ९९ ॥

असें सन्निधी त्यासि कां नेण होसी । गिरीकुहरीं वस्ती त्या कासयासी ॥ मृगूनाभिचा गंध शुद्धीसि नेणें। तया धुंडितां आठवी केंवि जाणें ॥ १०० ॥

रवी कीर्ण बिंबाहुनी दूरि कैंचे । तया पाहतां तेंचि

स्वरूप त्याचें ॥ तसा तूंचि तूं आपण न जि पाहे ।
नको भ्रंश बुद्धीसि घालूं अपापे ॥ १ ॥
जें जें देखसी देखणा तूंचि त्य चा । सरे देखणें साक्ष तूं देखण्याचा ॥ नये तूजवांचूनि कोठेंचि कांहीं । नको साधनाचे पडों व्यर्थवाहीं ॥ २ ॥
असे तुंबरे आणिका प्रत्ययासी । तया जाणतां तेंचि होऊनि ठासी ॥ नसे यासी आयास कांहीं बळाचा । तया पाहतां तोचि सोशील साचा ॥ ३ ॥
जया चिंतितां चित्त नाहींच होये । जया आठवीतां मनासीच खाये ॥ जया अर्चितां अर्चनातें न साहे । स्तवीतां जया स्तवन ऐलाड राहे ॥ ४ ॥
गुरू हा कसा थोरिवे आकळेना । लघूही नव्हे दृश्य जातां मिळेना ॥ असो हें जसें मानिलें तेंचि त्यासी । नयेंदाविता देखतां लोचनासी ॥ ५ ॥
लघू तो बहू मान्यता साहवेना । गुरू बोलतां जाड्य अंगीं दिसेना ॥ गुरू ना लघू नोहुनी कांहीं ऐसा । असो ज्यापरी स्वामि राहील तैसा ॥ ६ ॥
नमो ऐसिया सद्गुरू निर्गुणासी । परी नाकळे काय वर्णूं तयासी ॥ जया रूप ना नाम कोठें दिसेना । तया लक्षितां लक्ष पूरों शकेना ॥ ७ ॥
बहू हा दुरी अंतरीं सर्वजीवा । जिवा नातळो निश्चिकारी स्वभावा ॥ जसा भाविला त्यासि तैसाचि होये । दिसोनी बहू सस्वरूपींच राहे ॥ ८ ॥
चिदाकाशिचा भानु प्रकाशकर्ता । उदेला सदा अस्तु

ऊदेन होता ॥ जेणें ग्रासिलें मोहरात्रीस पाहीं । अहं-
तिमीरा ठाव कोठेंचि नाहीं ॥ ९ ॥
निशी चांदणें हाचि गाळोनि ठेला । मनोचांदही
हारपोनि च गेला ॥ प्रकाशापुढें आन कांहीं दिसेना ।
असे तोचि तो भाव्यभावा उरेना ॥ १० ॥
अणूमात्र बीजीं समग्रुचि जैसा । लपाला वदूं कांहीं
नाहींच ऐसा ॥ जयीं अंकुरेसीं निवे बाहेरी तो । तयीं
नाकळे गगनचुंबीत जातो ॥ ११ ॥
पुन्हा मोहितां बीजमात्रींच राहे । अव्यक्तीं तसें
विश्व नाहींच होये ॥ तरी व्यक्त अव्यक्त हा चेतवीता ।
गुरू स्वामि हा सर्वसर्वा नियंता ॥ १२ ॥
जसा अग्निकाष्टीं काष्ट नेणचि त्यासीं । धरी उन्नती
तोचि जाळी तयासी ॥ मग अग्नि ना काष्ट होऊनि
राहे । तसा सद्गुरू स्वामि हा वर्तताहे ॥ १३ ॥
तयाचे पदीं चित्त हें लीन जालें । नव्हे भिन्न त्या
समरसीं मिळालें ॥ अकस्मात हा लाभ योजूनि आला ।
गुरू नीळयासी तुकोस्वामि जाला ॥ १४ ॥
अनुष्ठान तें तें अहंतेसि मूळ । होऊनी पुढें मोह
घालील जाळ ॥ बहू श्रूतता देउनी जाणिवेसी । नेदि
आतळों सस्वरूपासुखासी ॥ १५ ॥
बहूसाल ज्ञानें बहू जाणिवेचा । बहू स्फुंद होतो
बहू मान्यतेचा ॥ कधीं पावसी शांति सूखासि आतां ।
न देखोनि विश्वीं त्रिदश नियंता ॥ १६ ॥
जयाचेनि या सर्व दिसे असे ही । जयाचेनि चळे

ढळे सर्व कांहीं ॥ असा अंतरींचा सखा नेणसी कां । जयाचेनियां तूंचि तूं माजि नाका ॥ १७ ॥

जेणें वीणस्तंभा धरीलें नभासीं । जळामस्तकीं थावरीलें महीसी ॥ जेणें चंद्रसूर्यादि नक्षत्र माळा । नभीं चालवीलया असंभाव्य ळीळा ॥ १८ ॥

जयाचेनि हे प्राण अपान देहीं । सदा वर्तती चाळिती इंद्रिया हीं ॥ जेणें न मिळे सोडिती त्याचि वेळा । नुलंघूनि आज्ञा मती त्याचि काळा ॥ १९ ॥

असा सर्व सत्ताधीश त्रीजगचा । त्रिदशाजना मानवा राक्षसाचा ॥ जयावीण हें न चळे आणुरेणू । निमिष्योनिमिष्या जयाचें प्रमाणू ॥ २० ॥

सदा सर्वरूपी सदा सर्वव्यापी । न सीवोन सर्वांतरीं पुण्यपापी ॥ जयामाजि तैसाचि होऊनि ठाके ।, अलिप्तपणें आपरूपीच थोके ॥ १२१ ॥

समग्राचि हा जेथिचा तेथ राहे । परी एक अंश जगा स्पर्शताहे ॥ जसा भानु हा व्योमिंचा व्योमस्थानीं । वसोनी जगा स्पर्शतो रश्मिकीर्णी ॥ २२ ॥

जळीं हा स्थळीं काष्टिं पाषाणिं आहे । सदा सर्वदा जेथिचा तेथ राहे ॥ कसा लाघवी हा कळासूत्रधारी । करी नाटकें चाळि प्राचीन दोरी ॥ २३ ॥

असे स्थावरीं जंगमीं सूक्ष्मदेहीं । असे पोकळीमाजि नभी मही हीं ॥ जयावीण हे रिक्त कांठें असेना । तया नेणती भाविती लोक नाना ॥ २४ ॥

विहारश्यय्यासनीं भोजनीं ही। वसे स्वप्नतुर्यादिका

अंतरीं ही ॥ अणूरेणव्यापी नव्हे त्यापरौता । असे सर्वदा सर्वही हा निरुता ॥ २५ ॥

अविद्यांतरीं हा सुविद्यांतरीं ही । महद्ब्रह्म व्यापूनि हा सस्यकीही ॥ वसे उत्तमादीक अंत्येज जाती । अनस्युत हा जन्मजरा क्षयांतीं ॥ २६ ॥

बहू दाउनी स्वर्वसंसारमाळा । जिवा भोगवी भोग प्राचीन वेळा ॥ जिहीं अर्चिलें कर्म ज्या ज्या विलासें । तया नेमिलें सुखदु:खासि तैसें ॥ २७ ॥

असा हा जनीं वाजनीं सर्व दाता । तयासी भजे रे करी हेंचि आतां ॥ नको वीसरूं सर्वथाही तयासी । धरी अंतरीं सद्गुरूतुकयासी ॥ २८ ॥

बरा लाभ हातासी हा आजि आला । मनीं सद्गुरू तुकया माठवीला ॥ तयाचेनि भोजें निळा नाचताहे । जनीं वीजनीं तोचि सर्वत्र पाहे ॥ २९ ॥

तया वेगळें आन कांहीं दिसेना । जडोनि तया राहिला तो ढळेना ॥ निळा स्वर्गसुखासि ही पात्र जाला । पदीं तुकयानें तया ठाव दीला ॥ ३० ॥

मनीं चिंतिलें आजि तें प्राप्त जालें । जुनें ठेवणें हस्तकीं सर्व दीलें ॥ असा हा तुका सर्वदानी उदारू । नुपेक्षी जयाचा करी अंगिकारू ॥ १३१ ॥

तसा पाहिजे एक विश्वास गांठीं । अनन्यासी तो सर्वथाही न लोटी ॥ जया बोधिलें त्या नुरे भ्रांतिलेशु । जनीं वीजनीं भेटवी त्या परेशु ॥ ३२ ॥

करी आपणासारिखें ज्यासि पाहे । चिदानंद बो-

र्धी च टेऊनि राहे ॥ ह्मणोनि तुका हा करा साह्य आतां। निळा निश्चयो सांगताहे समस्तां ॥ ३३ ॥

नका तुकयासी कदा भेद मानू । असे जीव जीवीं सदा तो समानू ॥ नभा व्यापुनी आणुरेणु प्रकाशें । असे व्यापुनी सर्वही तो निजांशें ॥ ३४ ॥

जया आचिंती देव तेतीस कोडी । महर्षी ऋषी तापसी मेरुपाडी ॥ महा साधनी योग जो का दुवाडे । तोहि साधितां योगियाचे चि चाडे ॥ ३५ ॥

नका साधनें ही तुह्मी आड आणूं । पहा सर्व साक्षी निजात्मा सुजाणू ॥ तया पहातां पहाणें तोचि होतां । तया तोचि भासे नुरे देहस्फुर्ती ॥ ३६ ॥

न दीसेचि तो देहबुद्धी पहातां । अभेदी दिसे तोचि तुह्मा अतीता ॥ नसे ना दिसे देखणें त्यासि दोन्ही तरी तो पहा तोचि त्यातें मिळोनी ॥ ३७ ॥

नुरे देखतां दीसणें ज्यासि बाप्पा । तया सद्गुरू बोलला पूर्ण कृपा ॥ जया सर्वथा जाणिवीचा विटाळू । तया भेटला सद्गुरू हा कृपाळू ॥ ३८ ॥

नुरे भेद अभेद ऐसाचि जाला । निजानंदरूपीं सदा तो मूराला ॥ स्फुरद्रुप मी देही नूठीच उर्मी । नव्हे सर्वसाक्षी निजात्मा निजात्मीं ॥ ३९ ॥

तयाचे पदीं नित्य कैवल्यरासी । पुढें तिष्ठती आणिमादीक दासी ॥ तेथें मुक्तिमोक्षासही कोण पुसे जया सद्गुरू बोळला चित्प्रकाशें ॥ ४० ॥

गुरू माऊली साउली हे अनाथा । स्नेहाळूपणें

पुरवी सर्व आस्था ॥ अपत्या दिना पाजुनि प्रेमपान्हा कशी रक्षिते अंगसंगीं अभिन्ना ॥ १४१ ॥

जयाचीक्रिया नित्य आनंदकारी । जयाचीक्रिया सर्व दानिर्विकारी ॥ जयाचीक्रिया आवडे पांडुरंगा । जयाचि क्रिया भोगवी सौख्यभोगा ॥ ४२ ॥

जयाचीक्रिया सत्य संकल्पपाळी । जयाचीक्रिया नित्यपर्वादिवाळी ॥ जयाचीक्रिया भाविका सौख्यदाती । जयाचीक्रिया मान्यसंतीं महंतीं ॥ ४३ ॥

जयाची क्रिया अमृता जीववाती । जयाची क्रिया भास्करा दीप्ति दाती ॥ जयाची क्रिया जीववाते मयंका । जयाची क्रिया सत्यबोधात लोका ॥ ४४ ॥

जेणे भक्तिवीरक्तिज्ञानासि ठावा । करूनी बरा दाविला हा उपावा । जेणे सत्यसनातनि वस्तु केली । आणूनि जना प्रत्यया दाखवीली ॥ ४५ ॥

असा हा तुका नित्य कैवल्यदानी । असें दावितो तत्ववाक्यें वदोनी । जनीं फेडिला देहसंदेह माझा । नमो ऐसिया सद्गुरू स्वामिराजा ॥ ४६ ॥

जेणें रासक्रिडामिसें गोपिकांसी । दिलें सौख्य आलभ्य जें कां महर्षी ॥ जयाचा नये लेश ब्रह्मादिकांतें । तपीं साधितां नातुडे शंकरातें ॥ ४७ ॥

नव्हे काम तो भग रतीसुकाचा । निजानंद तो वोपिला अंतरींचा ॥ जयालागिं शूकादिकें धुंडिताती । सदा संतही अंतरीं इच्छिताती ॥ ४८ ॥

तुका सद्गुरू सर्व भागी विरागी । असे तोचि होऊ-

नी त्यातेंचि भोगी ॥ तया आचिंती त्यासिही लाभ होतो । निळा सद्गुरु तूकयासींच ध्यातो ॥ ४९ ॥
जयाचे मनी तोची अध्यास लागे । स्वयें होतसे तोचि तैसा निजांगे ॥ जसें कीटकी भ्रुकुटीलागी जालें । तसें नीळया तूकयानेंचि केलें ॥ ५० ॥

जया पूर्ण आस्थानिजात्मा पदात्रा । तिही लक्षणी हा तुका ओळखावा ॥ जेणें पाहिलें सद्गुरु तूकयासी । तेणें पाहिलें सत्य निजात्मयासी ॥ १५१ ॥

असे देहचतुष्टयाही निराळा । मना बुद्धि ते न तळोनी म्हलीळा ॥ तया पाठवें हेंचि वाटे जयासी । तेणें पहावें सदूगुरू तूकयासी ॥ ५१ ॥

जेणें देवद्वीजांसि संतुष्ट केलें । जेणें यज्ञयागादिकां तोषवीलें ॥ विबुधादिकां नित्य आनंद केला । नमो सद्गुरूच्या अशा त्या पदाला ॥ ५२ ॥

आशीर्वाद ज्याचा महा लाभ देतो । निजात्मरूपा तत्क्षणीं मेळवीतो ॥ जेणें ठेविला मस्तकीं हात पूरे । पळे मोह अंधार तो पैल मेरे ॥ ५४ ॥

जेणें दीधलें सौख्य तें नित्य वाढे । त्वरें तत्पदा भेटवी त्यासि कोडें ॥ महानंद आनंद तो भोगवीत्या । याची कृपा पाववी सत्यसत्या ॥ ५५ ॥

जेणें पाहिलें ज्यासि कारुण्यदृष्टी । तया दाविली आत्मरूपेंचि सृष्टी ॥ पुन्हा त्या नुरे देह संदेह कांहीं । केलें आपणासारिखें त्यासि पाहीं ॥ ५६ ॥

हृदयावकाशें परहूनि परते । असे व्योम जें शून्य

त्याही अतीतें ॥ महाशून्य चिदांबरींचा आदियू । तयां भेटवीताचि आत्मा सतंतु ॥ ५७ ॥

जयाच्या प्रकाशा नसे पारलेखा । उदो अस्तु ना ग्रहणादि सांजऊका ॥ तया आत्मया सद्‌गुरू स्वामियासी । नमस्कार भज्ञा सदा तूकयासी ॥ ५८ ॥

जेणें बोधिला बोध मीळो सकेना । जेण दीधला स्वानुभव तो टळेना ॥ जेणें दाविला तोचि दृष्टीस राहे । निजात्मप्रकाशूचि सर्वत्र पाहे ॥ ५९ ॥

तया सद्‌गुरूस्वामिसी काय दऊं । उत्तीर्णासि कांहीं न दिसे उपाऊ ॥ मुळीं पाहतां मीहि माझें दिसेना । तया तोचि आतां पदीं मी अभिन्ना ॥ ६० ॥

वरी स्नानसंध्या करूं देवपूजा । नसे यज्ञयागादिकीं भाव दूजा ॥ बरा सद्‌गरू सर्वरूपीं विलासे । जयामाजि तैसाचि भासी अभासे ॥ १६१ ॥

जया आदिना अंत कोठेंचि नाहीं । नसोनी असे सर्वदा सर्व देहीं ॥ जया पाहतां दृष्टि पूरों शकेना । अणूमाजिही लोक व्यापूनि नाना ॥ ६२ ॥

जेणें ऊठिला भानु भेळेचि नेणें । प्रकाशी जगातें स्वतेजें स्वकीर्णें ॥ जेणें ताविला अग्न हो तो निवेना । कदा उष्णता यागुनी तो वसेना ॥ ६३ ॥

जेणें जीवनें भरिल्या तोयरासी । पुरोनी जगा ऊरला तो विशेषीं ॥ जेणें वोटिला मंडपू या नभाचा । नसे स्तंभ ना दोर कांहींच साचा ॥ ६४ ॥

जणें अंतारिक्षाचि नक्षत्रमाळा । कसा लोंबवील्या

203

करिती झळाळा ॥ जेणें सोमहा अमृताचाचि अंशी । भरीलया कळा नीववीतो जगासी ॥ ६५ ॥

जेणें हीमवं हिंवाचाचि केला । न तापेचि तो सीत होऊनि ठेला ॥ जेणें पृथ्वीयेसी क्षमत्वासि दिलें । जळामस्तकीं आचळू स्थावरीलें ॥ ६६ ॥

जेणें नीर हें काय पीळोनि केलें । न सांडी उष्ण त्या अग्नीसी काय दीलें ॥ जेणें सूर्य प्रकाशिला कासयानें । न लक्षचि देवामहर्षीं न ध्यानें ॥ ६७ ॥

असा स्वामि हा सर्व चातुर्यसिंधु । तया नेणती हे कसे बुद्धिमंदु ॥ तया सद्गुरूच्या न लागोनि पाया । वृथा धाडिला जन्म केला अपाया ॥ ६८ ॥

पुढें जन्मजरा असंख्यात व्याधी । असे मृत्यु हा नेणती पापबुद्धि ॥ मरोनि स्वयें जन्म घेऊनि यावें । पुढें यातनेलागिं सिद्धच व्हावें ॥ ६९ ॥

महा दुःख तें मातरोदरपंकीं । वसोनी असावें नवमास नर्की ॥ महा दुःख तें जन्मकाळीं जिवातें । नव्हे निर्गती नाचले युक्ति तेथें ॥ ७० ॥

असे लक्षचौऱ्यायसिचा होत फेरा । तरी नेणते भाग्यमंदा गव्हारा ॥ तुका सद्गुरू सिद्ध सांडोनि ऐसे । भवं भोगिती नित्य नवेचि कैसे ॥ १७१ ॥

जया सद्गुरू नीज वाक्याचि सवे । स्वयें तत्पदा जाउनीयां मिळावें ॥ असा तो सखा दूरि नाहींच कोठें । जया साहसी त्यांतरीं तोचि भेटे ॥ ७२ ॥

जया एक ना दूसरें ध्यान नाहीं । सदा सर्वदा सर्व

अंतर्य बाही ॥ असा सद्गुरू तूकया शरण जारे । होती तूंचि तूं सर्वव्यापी तसारे ॥ ७२ ॥

न लागे तुतें योगयागी बसावें । आहेसि जसा तेंचि असोनि व्हावें ॥ न लागे तुतें भोगणें त्यागणेंहि । न-लागे दुरी गम्य देशांतराहीं ॥ ७४ ॥

असा सुगम पंथ या तुकयाचा । नव्हेची कदा आ-दरू साधनाचा ॥ जयामाजि तैसेंचि होऊनि जावें । तया बोधितां सर्व होईल ठावें ॥ ७५ ॥

नसे दक्षणापूजनाची अपेक्षा । जया सर्व पदार्थ जाती उपेक्षा ॥ न घेऊनि कांहींच ऐश्वर्य देतो । स्वयें आपणासारिखें त्या करीतो ॥ ७६ ॥

जयाचे आनंदासि नाहीं समाप्ति सदा सर्वदा डुल्लत जो अनार्धी ॥ जाया एक मी दूसरें हें उरेना । जया-माजि तैसाचि होऊनि नाना ॥ ७७ ॥

असे बैसला तेथुनी सर्व देशा । असे पूरला वायु सर्वत्र तैसा ॥ जया दूसरें भोग्य कांहीं दिसेना । स्वयें भोग्य भोक्ताहि देहीं असेना ॥ ७८ ॥

जया सद्गुरू पूर्ण कारुण्य दृष्टी । असे बोळला तोचि सभाग्य सृष्टी ॥ तया जन्म जन्मांतरीं येत जातां। अशंकाचि नाहीं जशी स्वप्नऽवस्था ॥ ७९ ॥

तया होउनी जन्म ठावाचि नाहीं । असे कीं नसे नाठवे हेंहि कांहीं ॥ जया येतजातां मसे जन्मखंती । असे तूंचि असे स्वरूपानुवृत्ती ॥ ८० ॥

अशा सद्गुरूच्या कृपा वैभवानें । वरीला जसा

सूर्यप्रकाश कीर्णे ॥ समाधान चित्ता सदासर्वदाही । तया काय व्हावें कदा भान नाहीं ॥ ८१ ॥

स्वसुखासुखासी लिगटोनि ठेला । सदा अंतरीं बाहेरी तो निवाला ॥ तेणें मस्यक आदि ब्रह्मादिकांसी । समत्वेंचि पाहे नमानी विशेषीं ॥ ८२ ॥

नव्हे इंद्रचंद्रादिका लाग जेथें । तया पावला तत्पदालागि तेथें ॥ जेथें जाणणें नेणणें हें असेना । तयामाजि तेंचि दुजें ऊससेना ॥ ८३ ॥

नसे मीच येथें सर्व स्थिरैव पाहीं । असे मीचि हें सर्व जाणोनि पाही ॥ असे निश्चयें सद्गुरूचेनि मूखें । धरी एक पक्षास राही स्वसूखें ॥ ८३ ॥

जरी सर्वही तूंचि जालासि बापा । तरी भूतभेदा नयेची विकल्पा ॥ जरी नोहुनी कांहींचि होंचि ठासी । तरी तू तया पावसी तत्सुखासी ॥ ८५ ॥

असें बोलिलों सद्गुरूच्या निरोपें । नसे चावळलों कदा वावजल्पे ॥ बरें अंतरीं हें विचारूनि पाहे । असत्यानि रीझों नको सांगताहे ॥ ८६ ॥

निळा सद्गुरूचाचि अंकीत झाला । पदीं तूकयानें तया ठाव दीला ॥ असें बोधिलें तेंचि बोलून ऊठी । स्वयें जाणण्या नेणण्यातीत गोठी ॥ ८७ ॥

बरें जाणोनि घेइजे हे महंती । सदा सत्य वीचार शूरीं समर्थीं ॥ निळा तो सदा नेणतें तान्हुलेंचि । परी बोलवी माउली तेचि त्याची ॥ ८८ ॥

जरी नेणतें बोबडे बोल बोले । तरी माउली मानवे

त्यासि डोले ॥ करी कोड म्हणे दिठावेल तान्हें । तया साक्षपें ऊतरी निंबलोणें ॥ ८९ ॥

तद्‌ भक्त आनंत या विठ्ठलाचे । परी दुर्लभ् शिष्य जे सद्‌गुरूचे ॥ तयाच्या घरीं दास्यकर्ता न भागें । आणी गोणिया तोय वाहे निजांगें ॥९०॥

जयाचे शिरीं हात या सद्‌गुरूचा । तया दास्य मागे प्रभू निर्जराचा ॥ ह्मणे तूमच्या संगें सूखें रुपाये । तुह्मा सांडूनी आन कोठे न जाये ॥ १९१ ॥

गुरूचे पदीं रंगलें चित्त ज्याचें । करी सर्व साहित्य येऊनि त्याचें ॥ कदा नेणती सद्‌गुरूवांचुनी जे । सखे सज्जन सोयरे तेचि माझे ॥ ९२ ॥

जया सद्‌गरूसेवनीं नित्य गोडी । पदीं आर्पिती सद्‌गुरुचेचि जोडी ॥ तया देउनी काय उत्तीर्ण होऊं । तयाचें किजे दास्य हाची उपाऊ ॥ ९३ ॥

असे देव आभारला हेचि बोले । गुरू सेवकाधीन माझें जियाले ॥ महा रिद्धिसिद्धी कदा घेती ना ते । जया तुच्छ ब्रह्मांडिचे भोग ते ते ॥ ९४ ॥

जया मोक्ष मुक्तीचिही चाड नाहीं । विनासद्‌रूदास्यवांचूनि कांहीं ॥ तयाचे घरीं निस्यता म्या बसावें । ह्मणे श्रीहरी दास्य त्याचें करावें ॥ ९५ ॥

जया वास वैकुंठिचाही न माने । क्षिराब्धीसुखा न घेती थोर मानें ॥ महा भोग ते स्वर्गिंचे नावडती । गुरू-सेवनीं त्या अनुराग चित्तीं ॥ ९६ ॥

जिहीं मर्दिले कामक्रोधादिकांसी । अहंभाव निर्दाळिले

निश्चयेसी ॥ जिहीं दूषणिंदेसिही नीवटीलें । प्रतिष्ठादि दंभादिकां बोळवीलें ॥ ९७ ॥

मनीं एक तो ठेविला नित्य बोधु । जिहीं तोडिला सर्व आशासमंधु ॥ सदा दास्य या अर्चिलें सद्गुरुचें । जिवीं ध्याउनि सर्वदा रूप त्याचें ॥ ९८ ॥

गरूचे पदीं निश्चयो नित्य ज्याचा । तयाचे घरीं दास मी सत्य साचा ॥ असें श्रीहरी गूज सांगे रमेसी । ह्मणे मी वसें सर्वदा त्याचिपासीं ॥ ९९ ॥

ह्मणोनि निळा सदगुरुच्या पदासीं । जडोनिच ठेला नव्हे भिन्न त्यासीं ॥ सदासर्वदा तुकयाचेचि ध्यान। नव्हे विसरू नाठवे देहभान ॥ २०० ॥

असें दूरि जें कां दिगंता परौतें । तया चिंतिता तेंचि हें चित्त होतें ॥ ह्मणोनि तुका सद्गुरू हाचि ध्यायीं । तया पावसी सत्य याची उपायीं ॥ १ ॥

जसा रावणें द्वेषिला राम चित्तीं । समरीं स्वयें राम झाला देहांतीं ॥ तसाचि स्वयें कंसही कृष्ण जाला । मनीं ध्यासितां तोचि होवोनि ठेला ॥ २ ॥

जसी कीटकी भ्रगुंलीलागि पाही । भयें चिंतिता तेचि जाली स्वदेहीं ॥ ह्मणोनी भला हाचि अभ्यासयोगू । नसे घातु येथें करी लाभ चांगू ॥ २ ॥

निळा पावला सद्गुरूतूकयासी । मनीं निश्चयें अटवीतां तयासी ॥ वसे लोचनीं मानसीं तोचि आतां । जिवीं जीव जाला नहोनी परौता ॥ ४ ॥

धरीतां मनीं वाक्य या सद्गुरूचें । निळा लाधला

सौख्य त्याचे कृपेचें ॥ जनीं वीजनीं एक आत्माचि देखे । न मानी दुजे खंड ज्ञानें न तोखे ॥ ५ ॥

बहु मत्तमतांतरें काय होये । थिता भाव तोही दुऱ्हावोनि जाये ॥ तसे तर्कसिद्धांतही त्याचिपरी । जयें साधनें वाहवीताती दूरी ॥ ६ ॥

नव्हे अक्षरें घोकितां सौख्यलेशू । करी दंभमाना प्रतिष्ठे प्रवेशू ॥ तयें मंत्रयंत्रादि ऊपासनाहीं । बहू देखणीं लोटेती ते प्रवाहीं ॥ ७ ॥

जरी आसनें नित्य एकांतवासी । करी प्राण आपान नीरोधनासी ॥ त्यजूनी रस सेविती कंदमुळें । तरी आत्मप्राप्तीसी ते ते निराळे ॥ ८ ॥

तयालागी त्याचा नको वीट आला । मनीं आठऊं सद्गुरुतुकयाला ॥ जयाचेनि वाक्यें तत्पदेसीच भेटी । न लागे कदा सांडिमांडी अटाकी ॥ ९ ॥

निळा जाणोनी एक त्यातें न मानी । धरीलें जिवी ऐकिलें तेंचि कानी ॥ जसें बोधिलें सद्गुरूतूकयानें । असे सर्व मची त्यजी खंड ज्ञानें ॥ १० ॥

बरे तर्कवीतर्क ते दूरि केले । कृपासागरें भेदभ्रांतीस नेलें ॥ निजात्मपदीं स्थापिलें नीळयासी । तुकासद्गुरू बोळला हो तयासी ॥ ११ ॥

होतें गौप्य तें गुह्य भांडार दीलें । पदीं बैसवूनी पदायोग्य केलें ॥ नव्हे वीसरू आठवू सत्य त्याचा । असा बोधिला बोध त्यासी सुखाचा ॥ १२ ॥

जया भोगितां तृप्तिची भूक लागे । पाहावीचे वाटे

पहाणें न भागे ॥ असे सर्वदा तोंचि कोंदोनि ठेलें । असे अंतरीं बाहेरी तेंचि जालें ॥ १३ ॥

नये सांगतां रूप त्याचें कदाही । कशा सारिखे त्यासि दृष्टांत नाहीं ॥ तया देखतां तोचि व्हावें निजांगें । जसे रश्मिकीर्णचि ते सूर्यअंगें ॥ १४ ॥

नसे भेद अभेद ते केंवि दावू । जयालागि दूजेपणाचा अभाऊ ॥ नव्हे जाण जें कां स्वयें आपणासी । तया दुसरें कोण जाणेल त्यासी ॥ १५ ॥

असे आंत बाहेरी त्यातें न देखे । जशी शर्करा गोडी येते न चाखे ॥ तसें तेंचि तें जाण ना नेण ऐसें । नसोनीं असे तेंचि होऊन तैसें ॥ १६ ॥

धरी नाम अनाम त्याची मिरासी । धरी रूप आरूप जो चिद्विलासी ॥ धरी लोक अनेक त्या नातळोनी ॥ १७ ॥

दिसे दाखवी जो निजांगें अकर्ता । भरी किर्तीचे पुंज सर्वा विवर्ता ॥ जेणें निर्मुनी लोकलोकांतरासी । असोनी स्वयें नित्य तोहि उदासी ॥ १८ ॥

जया पाहतां नातळे लोचनातें । जया धुंडितां नाकळे जो मनातें ॥ नव्हे जो कदा दृश्य दृष्टा निजांगें । जया नेणिजे जाणिवेच्या प्रसंगें ॥ १९ ॥

जया आवडे भक्ति ते भाविकांची । जया नावडे जाणिवा जाणिवेची । नव्हे जो कदा साधनाही अपैता । तया पाहतां तोचि सर्वा अतीता ॥ २० ॥

असा हा तुका सद्गुरूस्वामि माझा । जेणें कीर्ती-

त्या उभिल्या दिव्य भूजा ॥ जया लक्षितां दृष्टि ही त्या पुरेना । तरी पाहतां तृप्तिही वोसरेना ॥ २१ ॥

घनःश्याम हा नूतन् नित्य भास । असें जो जिवीं तोचि बाहेरी दिसे ॥ असे सर्वदा सर्व व्यापी अरूपी । स्वयें स्फुर्तितें स्फुर्ति तोचि आरोपी ॥ २२ ॥

असे दुरि ना अंतरी जोचि ऐसा । निळा चिंतानीं योजिला तोहि तैसा ॥ तया सद्गुरूच्या नमो पादपद्मा । जसा भास्करी उत्सवु तोयपद्मा ॥ २३ ॥

नमीतां तया ठाव नुराचि रीता । वसे अंतरीं मीही तया अतीता ॥ निजांगें निळा तोचे होऊनि ठेला । तया आठवी तोचि होऊनि गेला ॥ २४ ॥

नमीतां नमण्यासी कोठेंचि नाहीं । तया तोचि नहोनिया भिन्न कांहीं ॥ निळा कीं तुका भेद उरेल कैंचा । तुका ना निळा आदि ना अंत याचा ॥ २५ ॥

जया चिंतिता चित्त चैतन्य जालें । जया लक्षितां लक्ष लागोनि गेलें ॥ जया ध्यासितां ध्यान हीं मीच जालों । पदा लागतां पादपद्मीं विरालो ॥ २६ ॥

नये सांगतां दावितां रूप त्याचें । नये उपमे तूकया तूक कैंचें ॥ निघे शब्द त्याहि अतीता । दिसे दृश्य अदृश्य त्याही परौता ॥ २७ ॥

असा सद्गुरू हा तुकोस्वामि माझा । नसे साम्य तें पाहतां त्यासि दूजा ॥ तयाचे पदी रंगला नित्य नीळा । तदाकारता पावला तो स्वलीळा ॥ २८ ॥

असे शक्ति चक्राहुनि या परौता । स्वलीळाचि वर्ते

करूनी अकर्ता ॥ जयानमिसं मी हें मझें कदाही । अरूपी रूपातीत तो सर्वदा ही ॥ २९ ॥

निळा रक्षिला नित्य सेवानुवृत्ती । अशिर्वाद देऊनियां दिव्य स्फुर्ते ॥ ह नाम गाऊतिया गूण वाचे । असे चिंतनीं सद्गुरू तूकयाचे ॥ ३० ॥

नये जाणतां जाणण्याहि निगळा । न दिसे कदा लक्षितां चर्म डोळा ॥ नये ऐकतां देखतां स्पर्शताही । नसोनि असे सव अंतर्य बाह्यीं ॥ ३१ ॥

अपे व्यापुनी सर्व आकाश जैसें । परी नातळे स्पर्शलें त्यासि तैसें ॥ असे नाहीसा सर्व अंतर्य बाहीं । तया सद्गुरू व्यापकू सर्व कांहीं ॥ ३२ ॥

नसे वर्ण व्यक्ती परी सुंद्गुरू तो । बहू दाउनी रंजवी जोववीतो ॥ परी आपरूपा समानूाच राहे । अनुमान दृष्टांत तोही न साहे ॥ ३३ ॥

नव्हे रक्त ना श्वेत ही पीतवर्ण । हरितु नव्हे जांबळा नीळ कृष्ण ॥ तया कासियासारिखें हो म्हणावें । अरूपा रूपातीत जो कां स्वभावें ॥ ३४ ॥

नयेना कदा जाइना दूरी कोठें । जयामाजीं तैसाचि भासोनि भटे ॥ असा सन्निधी ना दिगंतीं दिसेना । असोनी नसे लोक व्यापूनि नाना ॥ ३५ ॥

नसे दर्पणीं मूख दीसे खरेंसे । खरें देखेना आपणा लागि जैसें ॥ तसें दृश्य दाऊनियां वेगळेंची । न दीसे स्वयें तेंचि तें आपणासी ॥ ३६ ॥

स्वसंवेद्य हेंही असे बद्धगांठी । असे अमृत अमृ-

तातें न येटी ॥ स्वयें अग्न तो जाळिना आपणातें । रवीतें रवी देखोनीच न वर्ते ॥ ३७ ॥

खरें तें खरें नेणिजे अविद्या । रिझेना असत्या ते जाणा सुविद्या ॥ जसा नुगवे भानु त्या नांवरातीं । उदेला घडे दीवसूची गभस्ती ॥ ३८ ॥

नसे वंदिलें सद्गुरूच्या पदासी । उणें काय अज्ञान अज्ञान रासी ॥ असें जाणोनि आठवी नित्य त्याला । निळा चिंतनीं चिंतीतू तूकयाला ॥ ३९ ॥

गुरू बोलिजे ते गिरी पर्वतासी । लघू ते हळू भार नाहीं जयासी ॥ तसा हा नव्हे सद्गुरूस्वामि माझा । हळू जाड्य नाहीं समाजीं समाजा ॥ ४० ॥

तयाचेनि बोधें निळा मग्न राहे । तयामाजि तैसाचि होऊनि पाहे ॥ जनीं विजनीं तोचि देखे तयासी । निळाही तसा त्याचिया सामरसीं ॥ ४१ ॥

नसे मी येथें सर्वही तोचि जाला । जयामाजिं तैसाचि होऊनि ठेला ॥ दिसे देखतां तोचि त्यातें निजांगें । तयामाजि मी तोचि तेणें प्रसंगें ॥ ४२ ॥

न भावीतही जाणिवे तोचि येतो । न चिंती तरी चिंतनीं तोचि राहतो ॥ असे मानसीं चित्त चैतन्य प्राणी । रसस्वादनीं लोचनीं तोचि घ्राणीं ॥ ४३ ॥

त्वचाश्रोत्रही तोचि होऊनि ठेला । जिवींजीव व्यापूनिही इंद्रियांला । जसी क्षारदा सिंधुतोयींच राहे । परी मेघमूखींचि ते गोड होये ॥ ४४ ॥

प्रपंचू तसा सद्गूरूचेनि मूखें । परब्रह्म बोधेचि

होऊन ठाके ॥ नसे मी असे तोचि ते सर्व कांहीं। घटत्व जसें मृत्तिकेमाजी नाहीं ॥ ४५ ॥

दिसे दृश्य तें दृश्य माझ्या विकल्पें। स्वयें सत्य मी मिथ्य माया अरोपें ॥ माया उपाधीक शीवत्व शीवा। अविद्या उपाधीक जीवत्व जीवा ॥ ४६ ॥

माया अविद्या उपाधी निरासी। स्वत:सिद्ध आत्माचि तो चिद्विलासी ॥ जरी सर्व आत्माचि बोधासि आला। प्रपंचू तरी ऐक्यभावें निमाला ॥ ४७ ॥

म्हणे दृश्य द्रष्टा नव्हे मी निजांगें। असे मूळींचा मूळ निर्मीत सोंगें ॥ घटाकाश जैसें मठाकाश भासे। उपाधीनिमित्तचि तें भिन्न दीसे ॥ ४८ ॥

परी मुख्य आकाश तें तेंचि पाही। उपाधीविनाशें न भंगेचि कांहीं ॥ अळंकार होऊनियां मुख्य सोनें। नव्हे भिन्न त्या वीकतां मोलमानें ॥ ४९ ॥

तसें विश्व हें एक आत्माचि जाला। तयामाजी मी तोचि होऊनि ठेला ॥ म्हणोनी धरा पाय त्या सद्गुरूचा। मनीं ध्याउनी स्वामिया तूकयाचे ॥ ५० ॥

नव्हे आजिचा कालचा नूतनू मी। नसे रूप आरूप नामीं अनामीं ॥ असें तें नये दावितांही दिसेना। नये सांगतां शब्द पूरों शकेना ॥ ५१ ॥

असें बोधिलें सद्गुरू तूकयानें। निजानंद देऊनियां थोर मानें ॥ निळा त्या सूखें तोचि होऊनि ठेला। पदीं सद्गुरूचे विरोनीच गेला ॥ ५१ ॥

पुढारोनियां भक्त कारुण्यसिंधू। करें स्पर्शलें मस्त-

का दीनबंधू ॥ तयाचाचि नेणो फळोद्देश जाला । सबाह्यांतरीं तोचि कोंदोनि ठेला ॥ ९३ ॥

दिसे अंतरीं बाहेरी सर्व तोचि । जनीं वीजनीं ठाव रीता नुरेचि ॥ जिवीं जीव जाला शिवीं शीव जाला । देहीं देह होवोनियां तोचि ठेला ॥ ९४ ॥

अळंकार जैसे सुवर्णचि जाले । परी सांडूनी त्यासि नाहींच गेले ॥ तसा तोचि तो सर्व अंतर्य बाह्यीं । निळा नामरूपासि ठावाचि नाहीं ॥ ९५ ॥

उठीं सागरीं लाट आनंत कोटी । परी जीवनूची तया पाठिपोटी ॥ तसा तोचि तो व्यापितां व्याप्य जाला । निळा आपणा भिन्न नाहींच केला ॥ ५६ ॥

मुळीं तंतु एकाचि आनंतपट्ट । जरी भासलें त्यांतरीं तोचि स्पष्ट ॥ जसी मृत्तिका तेचि पात्रें अमूपें । तसा तोचि तो मी वृथा आपरूपें ॥ ९७ ॥

असा नाटकी तोचि विस्तारलासे । जनीं विजनीं तोचि होऊनि भासे ॥ बहू लोक अनंत ब्रह्यांड माळा निजांश दाऊनियां त्यानिराळा ॥ ९८ ॥

असा सर्व व्यापी परी त्या अनन्या । प्रत्यक्षचि फोडोनियां भ्रांति दैन्या ॥ जसा चातकालागिं आकाशबिंदू । मूखीं वर्षोनी फेडि तृषा समधू ॥ ९९ ॥

जया देखतां अंतरीं आर्त जैसें । तयालागिं तैसेंचि होणें निजांशें ॥ जसी व्याघ्रिणी स्नेहें वत्सासी पाळी । दुजें देखतां भक्षूं धांवे कराळी ॥ ६० ॥

तया तो नसे आपुलें कीं परावें । परी पावती लोक

संकल्पभावें ॥ वरी प्रेमळा भेटि येऊनि देणें । तसें नास्तिका नाहीं ऐसेंचि हे णें ॥ ६१ ॥

दिसे दर्पणीं मूख ज्याचें तयासी । नसे दर्पणीं तें असें त्याचि पसीं ॥ असें ज्या जसें त्यासि तैसाचि दावी । बरें वोखटें त्यासि तैसाच भावी ॥ ६२ ॥

तसा जो जनीं दीज·हिी पाहतां । ज्यालागि तैसा चि ते विश्वकर्ता ॥ तया दाखिलें सत्य जैं मानित ती । तिहीं देखिलें दृश्यमायिक भ्रांती ॥ ६३ ॥

जसा भक्त प्रल्हाद अंकीं धरावा । तेणेंचि रुपें दैत्य चिरोनि घ्यावा ॥ असे भावना ज्यांतरीं त्यासि तैसा । उपाधीवरी स्फटिकूभास जैसा ॥ ६४ ॥

महद्ब्रह्म कोठी रोमरंध्रींच थारा । असा तो प्रभु आणुमाजीं पसारा ॥ तये लक्षितां रूप कोणासि कैसें । विबुद्धादिकां ब्रह्मयाही न भासे ॥ ६५ ॥

न दीसे कदा तोचि सर्वत्र देखे । न ऐके तरी सर्वही तोचि ऐके ॥ नव्हे दृश्य सर्वांसि भेटे । नये चाखतां जेवितां तोचि घोंट ॥ ६६ ॥

असे अंतरीं काय त्यासी आणावें । न दीसेचि त्यातें दिसेंजो पाहावें ॥ नसे स्थान त्या भेटिसी कोठें जाउं । नये जाइना त्या भवंडूं कीं ठेवूं ॥ ६७ ॥

न बोलेचि त्यातें कसें बोलवावें । न लक्षेचि त्यातें कसें ऐकवावें ॥ न पाहेचि त्यातें कसें काय दावूं । न घेची तया काय कैसेंनि देऊं ॥ ६८ ॥

न जायेचि त्यातें कसें बोलवीजे । न खायेचि

त्यातें कसें जेवविजे ॥ नसेना असे केंवि त्यातें पहावें। नसें अंग त्या काय त्यां लेववावें ॥ ६९ ॥

न लक्षेचि धाता भुलला कदाही। असे जागतू कीं निजेला स्वदेहीं ॥ घरीं कीं दुरीं कोण जाणेल कैसा। जुना कीं नवा नित्य अनित्य ऐसा ॥ ७० ॥

असे निर्जिवू सजिवू हें कळेना। असे कीं नसें पाहतांही दिसेना ॥ उभा बैसला कीं निजेला नलक्षे। तया काय कीजेचि पत्ते अपेक्षे ॥ ७१ ॥

नये सागरा कोठेंही सांठवीतां। नये व्योम हें त्यावया ठाव रीता ॥ नये थावरीतां मही आन ठायीं। तसा आत्मराजूचि सर्वत्र पाहीं ॥ ७२ ॥

नलक्षे जया पाहतां लोचनातें। नये ऐकतां केवि ऐको तयातें ॥ नये स्पर्शतां काय स्पर्शोनि घेऊं। नव्हे भिन्न त्या भेटिसी केंवि जाऊं ॥ ७३ ॥

नव्हे जो कदा आपुला ना परावा। नसेना असे व्याप्य अव्याप्य जीवा ॥ जया भेद अभेद लागों शकेना। तया केंवि घेऊं त्यागितां त्यागवेना ॥ ७४ ॥

नये त्यागितां ना धरीतां कदाही। वसे सर्व व्यापूनियां सर्व ठायीं ॥ असा हा तुका काय तूकूं तयासी। तुकातीत तो तोचि तूके तयासी ॥ ७५ ॥

निळा राहिला नित्य चिंतूनि त्यातें। नसे वीसरू तो निजांगेंचि वर्ते ॥ असे जो सदा दूसरें ग्रासुनीयां। स्वयें ग्रासुनी जो असे आपणीया ॥ ७६ ॥

नसे अंत ना पार ज्याच्या रुपातें। असे कीं नसे

नाठवे हेंहि ज्यातें ॥ वरीं कीं दुरी मी स्वदेशीं विदेशीं । कदा देखेना जन्ममृत्यूजरेसी ॥ ७७ ॥

असें वेचलों कीं नसें संचलों मीं । न जाणें कदा कोठाऊ कोण तो मी ॥ आलों मी पुढें जाइन हेंहि नेणें । तया जाणती त्यासि तैसेंचि होणें ॥ ७८ ॥

नुठे वृत्ति मी जाणतां हेंहि ज्यासी । स्वयें नेणतां हेंहि नुरेचि शेषीं ॥ तोहि सद्गुरू तूकयासी मिळाला । रवी कीर्ण तैसाचि होवोनि ठेला ॥ ७९ ॥

स्वयें जाणण्यानेणण्यातीत जाला । अकस्मात तैसा-चि होऊनि ठेला ॥ जसा शर्करे गोडियेची समंदू । त-रंगाजळा भिन्न नोव्हेचि सिंधू ॥ ८० ॥

नव्हे भिन्न मी काय चिंतू तयासी । न्याहाळी कसा दर्पणू दर्पणासी ॥ जसा देखेना भास्करू भास्करातें । निळा तूकया चिंतितां तेवि होतें ॥ १८१ ॥

तरी तोचि मीं मीहि तोचि स्वभावें । तरी वेगळें नूरिजे रूप नांवें ॥ प्रभा भानु हे नांवेचि भिन्न जाली । परी ते सदा एक एकीच ठेली ॥ ८२ ॥

स्वयें दृश्य द्रष्टाचि तो एक आंगें । जसी वामसव्यें निजांगीं निजांगें ॥ नव्हे नरनारायणा भेद कांहीं । स्वयें एकुचो भिन्न दाऊनि देहीं ॥ ८३ ॥

प्रभा भास्करू जेवि दोन्ही नहोनी । तसे सद्गुरू शिष्य ऐक्या मिळोनी ॥ जगद्रूप जनार्दनू हा स्वभावें । स्वयें तोचि तो दाउनी दोनि भावें ॥ ८४ ॥

तुका तोचि नीळा तसा ऐक्यरूपें । जनी दाउनी

भिन्न दोनी स्वरूपें ॥ अळंकार भासे परी तें सुवर्ण । नये भिन्न भेदातित एकवर्ण ॥ ८५ ॥

स्वयें भास्करू जेवि नेणे तमातें । तमूही तसा देखेना भास्करातें ॥ तसे संतही सद्गुरु ते अभिन्न । असद् नाहनी त्यांतरीं ही मिळोन ॥ ८६ ॥

जसी ते निशी भेटतां भास्करासी । तमा वीसरोनी मिळे त्या प्रकाशीं ॥ नुरे काळिमा लेश अंधार कोठें । स्वयें होउनी तोचि त्यासीच भेटे ॥ ८७ ॥

कटुत्वासि सांडुनियां सेंद जैसी । परीपक्क ते पावली गोडियेसी ॥ जसा शर्करा इक्षुदंडूचि जाला । स्वयें नामरूपासि त्यागूनि ठेला ॥ ८८ ॥

निळाही तसा चिंतितां तुकयासी । स्वयें तोचि जाला मिळोनी तयासी ॥ जसें सिंधुतोयेंचि तें मीठ जालें । पुन्हा मिळतां तोय होऊनि ठेलें ॥ ८९ ॥

बहू चित्र दाऊनियां एकि भिंती । परी चित्र मिथ्याचि तें आदि अंतीं ॥ स्वयें भिंत हीं मृत्तिकेचीच जाली । पुन्हा मृत्तिका भिंतिलोपें मिळाली ॥ ९० ॥

तसा हा तुका दाउनी नामरूपें । स्वयें आपणामाजि आपस्वरूपें ॥ निळा आणि तुका द्वैतभावा निरासी । स्वयें मीळणी मीळती सामरसीं ॥ १९१ ॥

जसा वन्हि मीळोनियां कर्पुरातें । स्वयें नूरवी आपणा ना तयातें ॥ तसें मीळतां सद्गुरू तूकयासी । दुजे हारवूनी निजात्मेसि ग्रासी ॥ ९२ ॥

नव्हे कांहींच त्यासि कैसें पहावें । उपाधीनिमित्ताचे

त्या ओळखावें ॥ उपाधी निराशी ते नाहींच होय । नये जाणतां जाणिवेच्या उपायें ॥ ९३ ॥

ह्मणोनी बरें ओळख तूकयासी । असे अंतरीं बाहेरी तो तुह्मांसी ॥ न दीसे तरी ताच तो सर्व आहे । तया लक्षुनी तोचि होऊनि राहे ॥ ९४ ॥

महा पंचभूतां भौतिकांही निराळा । असे चेष्टऊनी सर्वे विचित्र लीळा ॥ करी दाखवीही परी तो अकर्ता । असे शक्तित्रयां निर्गुनी ही नियंता ॥ ९५ ॥

तया नेणतां भोगिजे मूढ योनी । असंख्यात त्या दुःख शोकाभिदानी ॥ तरी लागवेगें धरा पाय त्याचे । मनीं चिंतुनी सद्गुरूतूकयाचे ॥ ९६ ॥

निळा सांगतो सर्वदां हेचि सर्वां । नका अंतरूं या सुखानंददेवा ॥ नये वेंचला तो क्षणू पूढती हा । हरूनी आयुष्या विटंबील देहा ॥ ९७ ॥

न मानी तया भोगणें तें न चूके । पुढें यातना योनिद्वारें अनेके । न दीसे उपाव अशा दुःखजाती । होती प्राप्त तेव्हां यातनाची अवर्ती ॥ ९८ ॥

निषिद्धाचि त्या शुद्ध कोणा म्हणावें । कसें वीष तें अमृतासी तुकावे ॥ अधर्मीच तो केवि मीळे स्वधर्मा । महा मूढ तो केवि पावेल आत्मा ॥ ९९ ॥

ह्मणोनी असें निंद्य तें तें त्यजावें । तयासंगती संगदेषें लिपावें ॥ जरी जोडली संगती सज्जनाची । तरी पाविजे संपदा सत्सुखाची ॥ ३०० ॥

तरी आठऊं पाय त्या सद्गुरूचे । जयाच्या कृपें

पाविजे सौख्य साचें ॥ जेणें तोडिला मोह संदेह फांसा । दिला बोध चित्ता न मिळेचि ऐसा ॥१०१॥

तया चिंतितां चित्त नाहींच होयें । उरी हीं पुढें ठेविना आटवातें ॥ असा सर्व ह्राऊनियां तोचि ठाके । नुरे आपणू नूरउनी अनेकें ॥ २ ॥

असे आठवा नाठवा जो समानू । स्वयें नुरउनी ज्ञान अज्ञान भानू ॥ तयाच्या पदा वंदितांची स्वलीळा। तदाकारता पावला नित्य नीळा ॥ ३ ॥

प्रतीबिंब बिंबाहुनी दुरि कैंचें । अभासें परी तेंचि स्वरूप त्याचें ॥ उपाधीच ते भास अभास दावी । सहस्रांवटीं नातळोनी स्वभावीं ॥ ४ ॥

जिये वस्तुचा गुणस्वभाव जैसा । अनादी असे तो चि आलाड तैसा ॥ असे अंगिची साउली मिथ्य जैसी । नव्हे सारितां दूरि ज्याची तयासी ॥ ५ ॥

स्वभावो जया तेंचि अध्यात्म त्याचें । न सूटे जसे साकरे गोडियेचे ॥ सुगंधु जसा कस्तुरीतें न सोडी । तसा हा तुका भ्रांति दैन्यासि फेडी ॥ ६ ॥

तसा ईश्वरू नामरूपासि नेणें । प्रकाशी परी विश्व-आभासि कीर्णें ॥ दिसावें जगें हा स्वभावोचि त्याचा । जसा दाहकू गूण हुताशनाचा ॥ ७ ॥

उदेला तसा होय मार्तंड तुका । जयाच्या प्रकाशें नुरेची अशंका ॥ करी आपणा सारिखेची अनन्या । महाराज हा सद्गुरू धन्य धन्या ॥ ८ ॥

तयाचे पदीं सर्व विश्रांत जोडे । मनीं आठवीतां

महा सौख्य वाटे ॥ कसा पावला आठवीतां त्वरेसी । विसावोनि ठेला हृदयावकाशीं ॥ ९ ॥

असें जाणतां हा सखा अंतरींचा । कळे अंतर्गुह्यार्थ जैसा जयाचा ॥ करी पूर्ण राहोचि नेदी अशंका । न पुसे तरी देखतां भाव नाका ॥ १० ॥

मनीं चिंतितां मूर्ति या सद्गरूची । करी भाविका आपणासारिखेंची ॥ नया भिन्न ते सर्वथा ऊरवीना । निजानंद भोगूनि राखे अभिन्ना ॥ ११ ॥

दया शांतिचा पूर्णसिंधूचि जैसा । भगनी असे आर्तिंकालागि तैसा ॥ बरा देउनी बोध त्या अंतरींचा । निजानंदरूपींच रक्षात साचा ॥ १२ ॥

पहा नीळयालागिं प्रसन्न जाला । अकस्मात येऊनियां बोध केला ॥ जसें सिद्ध दत्तात्रयें येउनीयां । दिलें तत्व जनार्दना बोधुनीयां ॥ १३ ॥

बरा साधला सर्व हीतार्थ आतां । तुको स्वामिचा हा आशिर्वाद होता ॥ निजानंदसुखासिची पात्र केला । निळा सद्गुरूस्वामिनीं गौरवीला ॥ १४ ॥

नेणों काय सुकृत होतें निजाचें । होतें जोडिलें जन्मजन्मांतरीचें ॥ फळोद्देश हे द्यावया तेचि आले । तुकोस्वामिच्या दर्शना योग्य केलें ॥ १५ ॥

मी तो नेणतें नेणतां हीत कांहीं । होतों वाहवीलों दुःखचिंताप्रवाहीं । उदासीन होवोनियां जीव देतां । अकस्मात हा पातला प्राणदाता ॥ १६ ॥

त्वरें येउनीयां समाधान केलें । धरूनी करीं हृदयीं

मेळविलें ॥ निज मस्तकीं हात ठेऊनि तेऱ्हां । केला तत्वबोधीं क्षणेंची रिघावा ॥ १७ ॥

निजांकीं निळा बैसवोनी कृपेनें । निःसंदेह केला बहूता रितीनें ॥ आशिर्वाद देवोनियां स्थापियेला । जनीं वांजनीं ऐक्यते पाववीला ॥ १८ ॥

महासौख्य तें अंतरीं गौप्य होतें । प्रकाशून तें प्राप्त केलें दिनातें ॥ निळा तेंचि पावोनियां तृप्त जाला । गुरूस्वामिनी तो पदीं स्थापियेला ॥ १९ ॥

स्तवीतां तया न चले वैखरीचें । जया रूप नाना मही सत्य साचें ॥ अरूपचि हा प्रगटूनी स्वरूपा । निळा बोलिला पूर्ण प्रतापकृपा ॥ २० ॥

जयाची मती नेणती वेद चारी । बहू शास्त्र सिद्धांत ही ऐल मेरी ॥ ऋषीही बहुमतमतांतरेंसी । पहाती परी नेणवे हा तयांसी ॥ ३२१ ॥

महद्भाग्य हें आजि उदीत जालें । गुरुस्वामिनीं सत्कृपें क्षेम दीलें ॥ बरा बोधुनी बोध चित्तासि केला । निळा संतजनाप्रती नीरवीला ॥ २२ ॥

कृपाळूपणें सत्य कारुण्य सिंधू । निळा स्थापिला देउनी नित्यबोधू ॥ हृदयस्थ त्या काय म्यां वीनवावें । पदीं स्थापिलें काय उत्तीर्ण व्हावें ॥ २३ ॥

पदीं रगलों सर्वदा सद्गुरूचे । महाराज या स्वामियां तूकयाचे ॥ जेणें नेत्र दिव्यांजनें सोज्वळीले । रुपा अपुल्या देखण्या योग्य केलें ॥ २४ ॥

नये जो कदा दृश्यभावास्वरूपा । तेणें दाविलें आ-

पणालागि कृपा ॥ निळा भेटुनी तत्व सिद्धांत दीला । पदीं स्थापुनीयां पदायोग्य केला ॥ २५ ॥

भवसागराचा सदा हा उतारू । करी पार ज्याचा करी अंगिकारू ॥ नेदी अंग अंगुष्ट भांजेंचि कोठें । महा कुशलू हा करी पार नेटें ॥ २६ ॥

जयाचानियां आत्मतत्वींच भेटी । जयाचेनियां सत्व-रूपींचि पुष्टी ॥ जयाचेनियां मोहअंधार फीटे । जयाचेनि हा कामसंकल्प तूटे ॥ २७ ॥

मनीं चिंतनीं ध्याउनी तूकयासी । निळा नित्य नीमग्न जाला तयासी ॥ असा त्याचिये आठवींचा विराला। अकस्मात त्यातेंचि पावोनि ठेला ॥ २८ ॥

बहूनीजनिष्ठ अर्चुनी सद्गुरूसी । निळा हेंचि प्रार्थूनि मागे तयासी ॥ ह्मणे हृदयीं माझिये त्वां बसावें । सदा नाम संकीर्तनीं प्रेम द्यावें ॥ २९ ॥

करूनी कृपा शोधुनी हेंचि दीलें । होतें अंतरीं आर्त प्रविष्ट जालें ॥ निळा ऐकतां नीजवाक्या निवाला । पदा वंदुनीयां सुखाचाचि जाला ॥ ३० ॥

ह्मणे धन्य हो धन्य स्वामी कृपाळा । नमो सद्गुरू दीनबंधू दयाळा ॥ करीतील जे नित्य अभ्यास त्याचा । मनोभाव सिद्धीसि न्यावा तयाचा ॥ ३३१ ॥

दिलें वाक्य तें सत्य सिद्धीसि न्यावें । अनाथादिनालागि हें बांधवावें ॥ निळा नित्य प्रार्थूनियां हेंचि मागे। किजे दान हेंची कीं येणें प्रसगें ॥ ३२ ॥

असे श्लोकसंख्या त्रिशततेतिसांची । निजस्तुती हे

सद्गुरू स्वामियाचा ॥ वडे नित्य आवर्तनू एक ज्यासी॥ करीती गुरू येउनी बोध त्यासी ॥ ३३१ ॥

१५०३

## ॥ आरती ॥

प्रपंचरचना सर्वहि भोगुनि त्यागीली । अनुतापाचे ज्वाळीं देहबुद्धि हविली । वैराग्याची निष्ठा प्रकटुनि दाखविली । अहंता ममता दवडुनि निजशांति वरिली ॥ १ ॥ जयजयजी सद्गुरू तुकया दातारा । तारक संतांचा तूं जिवलग सोयरा ॥ धृ० ॥ हरिभक्तीचा महिमा विशेष वाढविला । विरक्ती ज्ञानाचा ठेवा उघडुनि दाखविला । जगदोद्धारालागीं उपाय सुचवीला । निंदक दुर्जनांचा संदेह निरसिला ॥ जय० ॥ २ ॥ तेरा दिवस वह्या रक्षुनियां उदकीं । कोरड्याची काढूनी दाखविल्या शेखी । अपार कविता शक्ति मिरवुनी इहलोकीं । कीर्तन श्रवणें तुमच्या उद्धरती जन लोकीं ॥ जय० ॥ ३ ॥ बाळवेष घेऊनि श्रीहरी भेटला । विधी ज्या जनिता तोचि आठवा हा दिधला । तेणें ब्रह्मानंदें प्रेमा डोलविला । न तुके ह्मणुनी तुका नामीं गौरविला ॥ जय० ॥ ४ ॥ प्रयाणकाळीं देवें विमान पाठविलें । कळिच्या काळामाजी अद्भुत वर्तविलें । मानवदेह घेउनि निजधामा गेले । निळा ह्मणे सकळ संत तोषविले ॥ जय० ॥ ५ ॥

REFBK-0001813
REFBK-0001813
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ९८९३
शाखा

# निळोबारायाचे माघ शुद्ध पंढरीस जाताना होणारे मुक्काम.

पौष. वद्य. ९ पाणोली. १० पारनेर. ११ बाभुळडी. १२ पिंपळगांवपिसा. १३ पारगांव मळ्यांत. १४ श्रीगोंदे. ३० शेडगांव. १ भांबोरें. २ खेड. ३ जिती. ४ पळसदेव. ५ लोणी–इंदापूर. ६ रांझणी. ७ वेगेगांव. ८ अकुंबें–वरवंडी सावतोबा. अरण. ९ रोपळे–अडीव. १० पंढरी.

# पंढरीनाथाचे पिंपळनेरास जाताना होणारे मुक्काम.

१३ सकाळ पंढरी. दुपार सोनक. संध्याकाळ महुद. १४ दु. कटपाळ सं. डांगींची. १५ स. शेणवड. सं. झर. (माघ वद्य) १ स. (घाटाचे माथ्यावर रिंगण) इकळे. सं. मायणी. २ स. (येरमळचे मळ्यांत रिंगण) निमसड. सं पिरसवडी. ३ स. पळशी व इळीव. स. न्हावी. ४ स. (रिं०) रहिमतपूर. सं. धामणेर. ५ स. जोतीपंतदादांचें चिंचणेर. सं. सातारा (मिरवणूक). ६ स. वाडेखेडें. (रिंगण) वडुताजवळ. सं: आरपळे. ७स. शिवतर अंबवडें सं. देऊर. ८ स. रिंगण. वाठारस्टेशन. ९ लोणंद. १० निरा. (स) वाल्हे. ११ सासवड. १२ (स. रिसेपिसे. पिसुरे. १३ (दु.) नारायणबेट (सु.) पारगाव रिंगण. १४ न्हाबरे. ३० घोडनदी. रिंगण. (फा. शु.) १ राळेगण पिंपळनेर.

# शुद्धिपत्र.

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| टायटल पेज | २—४ | १८६८ | १८६७ |
| १७ | ६ | स्त्वर्व | स्वर्ग |
| १७ | १६ | स्वर्ग | सर्व |
| १७ | २१ | तसा | तया |
| १८ | ९ | तुह्मी | तुह्मीं |
| १८ | १३ | तुह्मा | तुह्मां |
| १८ | १६ | बोलला | वाळला |
| २० | १० | पाठवें | पहावें |
| २२ | २४ | ध्यान | स्थान |
| २३ | १० | स्ववे | स्वयें |
| २३ | १३ | जाया | जया |
| २४ | १६ | वाबजलपें | वागजलपें |
| २८ | १३ | चरण ३ रा | धरीं सर्व सामर्थ्य कांहीं नहोनी |
| ३० | १२ | सुंद्गुरू | सुंदरू |
| ३१ | २२ | क्षारद्दा | क्षारता |
| ३२ | ४ | माया | माझ्या |
| ३४ | ११ | एक शब्द नाहीं. | ( दृश्य (अदृश्य) सर्वांसि ) |

# शंकर—ब्रदर्स
यांचा
## मेंथॉलार्क व ब्राम्हीतेल
किं. ०४ डझन २०४ किं. ०७ डझन ४०८

**मेंथॉलार्काचें गुणः**—जागरण करणारांस, मेंदूस शांतता आणण्याचे कामी फारच उत्तम होतो, असें आजपर्यंतच्या खपाच्या अनुभवावरून निश्चित झालें आहे. प्रवासी प्रवासास निघतांना संग्रहीं मेंथॉलार्काची बाटली ठेवतात, कारण वारा–ऊन–पाऊस–थंडी–सर्दी घाण–जागरण–उपवास इत्यादि दगदगीनें मनुष्य निराश होतो. व मेंदु तप्त होऊन डोकें दुखूं लागतें, अशा हाजारों वेळी ०४ आण्यांत उल्हासित होतां येतें.

**ब्राम्ही तेलाचें गुणः**—ह्याच्या आंगचे धर्म मनुष्यांच्या डोक्यांतील मेंदू–आशक्तपणानें—जागरणानें, [illegible]सानें–उष्णतेनें—श्रमानें, अशा अनेक कारणांनीं [illegible]कें दुखूं लागतें. त्यावर हजारो औषधोपचार करण्या[illegible]ां ह्या तेलाचा उपयोग डोक्यांस चोळण्याकडे करावा [illegible]पासून बुद्धि तरतरीत राहून डोळ्यांची नजर साफ [illegible]ोल. ह्याचा एकवेळ अनुभव घेऊन पाहावा.

**तुकाराम स्तुतिः**—निळोबास्वामिकृत हें पुस्तक आमचे दुकानीं विकत मिळेल.

शंकर—ब्रदर्स. रविवार पेठ,
फडाल्याचा वाडा, मोतीचौक, पुणें.